# केळीच्या बागेची जपणूक



**प्रा. अंकित खेडीकर**
श्री सेवकभाऊ वाघाये पाटील कृषी महाविद्यालय, केसलवाडा (वाघ), ता. लाखानी, जि. भंडारा
**गौरव घोरमाडे**
(आचार्य स्नातक)

**के**ळीच्या घडांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी घडांवर पांढऱ्या रंगाच्या प्लॅस्टिकचे किंवा पानांचे आच्छादन करावे. मृगबाग लागवडीच्या केळी बागेस सध्या ठिबक सिंचनाद्वारे ११ ते १२ लिटर तसेच कांदेबाग लागवडीच्या केळीस ६ ते ८ लिटर प्रतिझाड प्रतिदिन पाणी देणे आवश्यक आहे.

अवकाळी पाऊस, थंडी व आर्द्रतेचे प्रमाण वाढल्यामुळे केळीवरील करपा रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. यांच्या नियंत्रणासाठी कॉपर ऑक्झिक्लोराईड २५ ग्रॅम चांगल्या प्रतीच्या स्टिकरसह प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. अवकाळी पावसामुळे केळी घडांवर परिणाम होऊ नये म्हणून निसवलेल्या बागेतील घडांवर 'स्कर्टिंग बॅग' घालावी किंवा परिपक्व झालेले घड त्वरित काढावे.



डिसेंबर - जानेवारी महिन्यांत लागवड केलेल्या केळीवर येणाऱ्या 'कुकंबर मोझॅक' व्हायरसच्या नियंत्रणासाठी डायमिथोएट १५ मि.लि. किंवा इमिडाक्लोप्रिड ५ मि.लि. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

केळी फळाची गुणवत्ता वाढवण्यासाठी घडांवर १० लिटर पाण्यात पोटॅशियम डायहायड्रोजन फॉस्फेट ५० ग्रॅम + १०० ग्रॅम युरिया + सर्फेक्टंट ५ मि.लि. याप्रमाणे (पूर्ण घड निघाल्यास) एकदाच फवारणी करावी.

गारपीट व अवकाळी पावसामुळे झाडाच्या पानांवर, खोडावर तसेच घडांवर झालेल्या जखमांवर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव झाला असल्यास; झाडांवर कार्बेंडेझिम १.० ग्रॅम प्रतिलिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

एप्रिल महिन्यात मृगबाग केळीची बाग निसवणी किंवा कापणीच्या अवस्थेत असल्यास दररोज ३० ते ३५ लिटर पाणी प्रतिझाड द्यावे.

वाढते तापमान, ढगाळ वातावरण, अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे केळी पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. यांच्या नियंत्रणासाठी प्रोपिकोनेझोल १० मि.लि. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून स्टिकरसह फवारणी करावी.

केळीच्या बागेभोवती वारा प्रतिबंधकाची लागवड करावी.

बागेस नियमित पाणी द्यावे. बागेत आच्छादनाचा वापर करावा. घडांची प्रत खराब होऊ नये म्हणून घड केळीच्या पानाने झाकून घ्यावेत. पर्णउत्सर्जन कमी व्हावे म्हणून ८.० टक्के केओलिनची फवारणी करावी. गेल्या महिन्यात झालेल्या वादळी वाऱ्यामुळे झाडाच्या मुळ्या उघड्या पडल्या असल्या तर त्या मातीने झाकून घ्याव्यात. झाडास मातीने आधार द्यावा. शक्य झाल्यास मृगबाग लागवड बागेस दाणेदार स्फुरद २०० ग्रॅम प्रतिझाड व म्युरेट ऑफ पोटॅश ८२ ग्रॅम प्रतिझाड मिसळून द्यावे. यामुळे झाडाचे वजन वाढण्यास मदत होते. केळीच्या मुळ्या- खोडालगत आलेली पिले धारदार विळ्याने जमिनीलगत कापावी. ■